| MHKO050042312024 | **म.कौ.हि.सं.का.अर्ज नं. ६७/२०२४**<br>**निशाणी क्र. १२ वर आदेश**<br>**दिपाली रणजित बगाडे**<br>वि.<br>**रणजित वजीर बगाडे आणि इतर** |
|---|---|

**१.** यातील अर्जदार यांनी प्रस्तुतचे अर्ज हे कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ मधील तरतुदी नुसार तीच्या मुलांना भेटणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदार यांनी मूळ अर्ज वि.प. यांचे विरोधात कौंटुंबीक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अन्वये कोर्ट मजकूरी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत निशाणी १२ च्या अर्जात असे कथन केले आहे की, तीची मुलगी निकीता व मुलगा रणवीर हे सध्या वि.प. यांच्याकडे आहेत. अर्जदार ही नैसर्गिक माता असल्याने तीला प्रस्तुत प्रकरणामधील नेमल्या तारखांना मुलांना भेटण्याची परवानगी अर्जदार यांना मिळावी अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. वि.प. यांनी निशाणी १७ कडे प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. वि.प. यांचे असे कथन आहे की, अर्जदार हिला मुलांना भेटण्यास वि.प. यांनी कधीही मनाई केलेली नाही. अर्जदार या स्वत: मुलांना वि.प. यांचेकडे सोडून गेल्या आहेत. तेंव्हापासून वि.प. हेच मुलांचा सांभाळ करीत आहेत. मुलांचे शैक्षणिक नुकसान न होता भेटणेसाठी त्यांची काही हरकत नाही. सबब अटीवर अर्ज मंजूर करण्यास त्यांची काही हरकत नाही.

**४.** अर्ज निशाणी ११ व १४ व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी मूळ अर्ज कौंटूंबीक हिंसाचार कायदा कलम १२, १७, १८, १९, २० व २२ अन्वये दाखल केला आहे. अर्जदाराचे यांचे कथनानुसार वि. प. यांनी तीला

भांडण तंटा करुन मारहाण केलेली आहे. त्यामुळे ती नाईलाजाने घर सोडून गेली आहे. कु. निकीता व रणवीर ही अर्जदार हिला व वि.प. नं. १ पासून झालेली मुले आहेत. अर्जदार ही आई आहे. तसेच वि.प. यांनी देखील अर्जदार यांना मुलांना भेटण्याबाबत हरकत नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी नेमल्या तारखांना अर्जदार हिला तीच्या मुलांना भेटण्याबाबत परवानगी देणे योग्य होणार आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज निशाणी १२ मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत कामी पुढील आदेश होईपावतो प्रस्तुत प्रकरणातील नेमल्या तारखांना मुलांचे शैक्षणीक नुकसान होणार नाही या अटीवर अर्जदार यांना मुले कु. निकीता व कु. रणवीर यांना भेटण्यासाठी परवानगी देण्यात येते.

३. वि.प. यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदार यांची मुले कु. निकीता व कु. रणवीर यांना प्रस्तुत प्रकरणातील नेमल्या तारखांना अर्जदार यांना भेटण्यासाठी न्यायालयात हजर ठेवावे.

४. संबधीत आदेशाची प्रत संरक्षण अधिकारी,हातकणंगले व संबंधीत पोलीस ठाणे यांना पाठवावी.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2024.08.31 17:01:07 +0530

**दि. ३०/०८/२०२४**
**इचलकरंजी**

**(संजय दि.वानखेडे)**
**न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कोर्ट नं.४, इचलकरंजी**